नागपूर जिल्हा (ग्रामीण) पोलीस वार्तापत्र
पोलीस अधिक्षक कार्यालय, नागपूर.

# प्रेस नोट

**दिनांक १७/१०/२०२२ (सोमवार)**

**(सकाळ)**

---

## जिवानाशी ठार करण्याचा प्रयत्न करणाऱ्या आरोपीतांना अटक

**पो.स्टे. कन्हान** :– अंतर्गत ०५ कि.मी अंतरावरील पटेल नगर वार्ड नं २ कन्हान येथे दिनांक १५/१०/२०२२ चे २१.१५ वा. ते २१.३० वा. दरम्यान फिर्यादी नामे– सौ. रानी सुर्यागुप्ता आकरे, वय ३५ वर्ष, रा. पटेल नगर वार्ड नं २, कन्हान ता. पारशिवनी व आरोपी नामे– सुर्या गुप्ता हेमाजी आकरे, वय ४५ वर्ष, रा. पटेल नगर वार्ड नं २, कन्हान ता. पारशिवनी हे पती व पत्नी असुन आरोपी हा आर्मीमधुन आल्यावर फिर्यादीस 'आपल्या आई वडीलांकडुन २० ते २५ लाख रुपये घेवुन ये' असे म्हणून शिवीगाळ करुन मारहाण करीत होता. तसेच आरोपी हा फिर्यादीस शेतीचा हिस्सा मागत असून शारीरिक व मानसिक त्रास देत होता. आरोपीचे २.५ वर्षा पासुन कामठी येथे राहणारी महिले सोबत प्रेम संबंध आहे. घ.ता.वेळी.व ठिकाणी दुपारी ०२.३० ते ०३.०० वाजता दरम्यान आरोपी याने फिर्यादीला डयुटी आहे मी डयुटीवर परत जात आहे असे म्हणुन सामान घेऊन निघुन गेला असता फिर्यादीला संशय आल्याने फिर्यादी ने महिलेच्या घरी जावुन पाहले असता फिर्यादीचा पती हा त्या महिलेच्या घरी बसुन दिसुन दिसला. त्याबाबत फिर्यादीने विचारणा केली असता फिर्यादीचा पती व ती महिला यांनी फिर्यादीचे सोबत भांडण केले. त्यानंतर फिर्यादी आपल्या स्वताचा कन्हान येथे घरी आली व रात्री २१.१५ वाजताच्या सुमरास फिर्यादीचा पती घरी आला व फिर्यादीच्या पती ने जेवण मागीतले असता फिर्यादीने त्या महिलेच्या घरी जेवण का केले नाही या कारणावरुन आरोपीने फिर्यादी सोबत भांडण केले. आरोपीने हाताने फिर्यादीच्या गालावर मारले व घरातुन एक प्लॉटिकची बाटली आणुन त्यातील रॉकेल अथवा डिजेल फिर्यादीच्या आंगावर ओतल्याने फिर्यादी घराबाहेर पडत आली व आपल्या भावाला बोलावुन पोस्टे. कन्हान येथे तक्रार देण्यास आली.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. कन्हान येथे आरोपीविरुध्द कलम ३०७ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीचा शोध घेणे सुरू असून गुन्हयाचा पुढील तपास पोउपनि. मेश्राम मो.नं. ९६६७१७६६९४ हे करीत आहे.

## जबरी चोरी करणाऱ्या आरोपीतांना अटक

**पो.स्टे. बोरी** :–अंतर्गत ०३ कि.मी. अंतरावरील मौजा रूईखैरी शिवार एसीसी चौक ते बुटटीबोरी सर्विस रोड येथे दिनांक १५/१०/२०२१ चे २२.३० वा. ते २२.४५ वा. दरम्यान फिर्यादी नामे– मनिष चितांमण गोहणे, वय ४१ वर्ष, रा. प्रभाग क्र ०६ बुटटीबोरी ता.जि.नागपूर याने नेहमी प्रमाणे दिवसभर देशी दारू भट्टीवर विक्रीकरून आणलेल्या पैशाचा हिशोब करून निळया कलरच्या पिशवी मध्ये ६०,०००/–रू. आपल्या ऑफीस मध्ये जमा करण्याकरिता बुटटीबोरी येथे जात असतांना एक काळसर रंगाची लालसर पट्टे असलेली स्पेलेंडर मोटरसायकल त्यावर ३ ईसम बसुन आले. त्यांनी फिर्यादीच्या ताब्यातील मोटरसायकल समोर आणून फिर्यादीचे गाडीची चाबी हिसकावून त्यास हातबुक्कीने मारहाण करून व फिर्यादीच्या जवळचे पैशाची पिशवी हिसकावून त्याला चाकुचा धाक दाखवून ते तिन्ही ईसम ६०,०००/–रू. मुद्देमाल घेऊन पळून गेले. तपासा दरम्यान आरोपी नामे– कुलदीप सिंह लखखनसिंह बावरी, वय २७ वर्ष, रा. वार्ड क्र. ३ रूईखैरी एकता नगर ता.जि नागपूर, २) विशाल सुभाष

तुमाने, वय २५ वर्ष, रा. वेगांव ता.मारेगांव जि यवतमाळ ह.मु, रूईखैरी वार्ड क्र ३ एकता नगर कुलदिप सिंग बावरीचे घरी ता.जि. नागपूर यांना अटक करण्यात आली आहे.

सदर प्रकरणी फियादी यांचे रिपोर्ट वरुन पो.स्टे. बोरी येथे आरोपीतांविरुध्द कलम ३९४, ३४ भादंवि. अन्वये गुन्हा नोंद केला आहे. आरोपीतांना अटक करण्यात आली असून गुन्हयाचा पुढील तपास सपोनि साखरकर मो क्र ७३५०९०२१०० हे करीत आहे.

पोलीस माहिती कक्ष
नागपूर जिल्हा (ग्रामीण), नागपूर